# नियमित दिवाणी दावा क्र. ५५/२०११ मधील
# निशाण क्र. १३३ खालील आदेश
# (CNR No.– MHRT050004592011)

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.७ यांच्याविरूध्द झालेला प्रतिदावा अवसान आदेश रद्द करून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांचे कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.७ श्रीम.पार्वती धोंडु पंडे ह्या दि.१६/०७/२०१७ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे पश्चात त्याचे वारसांना अभिलेखावर घेण्याचे राहुन गेले आहे. सदरची बाब प्रस्तुत प्रतिवादी यांच्या लक्षात आल्यानंतर प्रतिवादी क्र. ७ यांच्या वारसांची नावे, पत्ते, वये याबबातची माहिती घेवून वकीलांना वारस अभिलेखावर घेण्यास सांगितले या सर्व बाबींमुळे प्रतिवादी क्र.७ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता २६७० दिवसांचा विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र.७ चे वारस मुदतीत अभिलेखावर घेतले नसल्याने प्रतिदावा त्यांचेविरुध्द अबेट झाला आहे. प्रतिवादी क्र.७ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता प्रतिवादी क्र.१ ची चूकी अथवा निष्काळजीपणा नव्हता. त्याचेविरुध्द झालेला प्रतिदावा अवसान आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादी क्र.१ चे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन त्यांनी प्रतिवादी क्र.७ विरुध्द झालेला दावा अवसानचा आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर वादी यांनी नि. १४३ ला म्हणणे देवून विरोध दर्शविला आहे. दाव्यामध्ये ९० दिवसांचे आत रेकॉर्डवर घ्यायचे असतात तरी प्रतिवादी क्र.७ चे वारस रेकॉर्डवर घ्यायला इतका प्रदिर्घ उशीर का झाला याबाबत कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नसल्यामुळे प्रतिवादी क्र. ७ यांचेविरुध्द दावा अबेट झाला आहे. दोन्ही दाव्याचे कामी प्रतिवादी आवश्यक पक्षकार नाहीत. प्रतिवादी क्र.१ यांनी या आधिच प्रतिवादी क्र. ७ चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते तरी कोणतेही संयुक्तीक कारण न दिल्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा. सदरचा अर्ज मंजुर करण्याचे न्यायालयाचे मत झाल्यास प्रतिवादी यांना जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा अशी विनंती त्यांचे

म्हणण्याद्वारे केली आहे.

**४.** अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला, त्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे सन्मानिय विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, प्रकरणाचा अभिलेख पाहीला, प्रस्तुत अर्जाचे नैसिर्गिक निर्गतीकरीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात, त्यावरील माझे कारणासहीत निर्ष्कष नमुद केले आहेत ते खालीलप्रमाणे.

| अ.क. | मुद्दे | निर्ष्कष |
|---|---|---|
| १ | अर्जातील मागणीप्रमाणे मयत प्रतिवादी क्र.७ यांचे विरूध्द दावा अवसान झालेचा आदेश रद्द करून मिळणेस प्रतिवादी क्र.१ पात्र आहे का? | होय |
| २ | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्द क्र. १ व २**

**५.** प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीत उभा केलेला वाडा पाडून त्याचा खुला व मोकळा कब्जा, वादी यांना देण्याकरीता आदेशात्मक ताकीदीचा व प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करु नये असा निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र. १ याने नि.२६ कडे प्रतिदावा मिळकतीतील वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी केलेल्या अतिक्रमीत भागातील बांधकाम तोडून त्याखालील जागा खुली करुन देण्याबाबत आदेश मिळण्यासाठी प्रतिदावा दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिदाव्यातील प्रकरणातील प्रतिवादी क्र.७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे यांचे दि.१६/०७/२०१७ रोजी मयत झालेची बाब यातील वादी यांनी नाकारलेली नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे अर्जाचे पृष्टयर्थ शपथपत्र दाखल केलेले आहे. तसेच अर्जासोबत प्रतिवादी क्र. ७ पार्वती यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.७ ह्या दि. १६/०७/२०१७ रोजी मयत झाल्या असल्याने मुदतीच्या कायद्यातील तरतुदीनुसार त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांना ९० दिवसांचे आत

प्रतिदाव्याच्या अभिलेखावर प्रतिवादी क्र.१ तर्फे घेणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र.१ यांच्या कथनांचा विचार करता, प्रतिवादी यांनी सदर मयताच्या कायदेशीर प्रतिनिधींची नावे, पत्ते, वये यांची माहिती घेवुन वारसांना अभिलेखावर घेण्यास सदरचा विलंब झालेला दिसून येतो.

**६.** प्रस्तुत प्रतिवादी क्र.७ यांच्याविरूध्द झालेला प्रतिदावा अवसान करण्याचा आदेश रद्द न झालेस प्रतिदाव्याचे स्वरूप व त्यामधील प्रतिवादी क्र.१ यांची मागणी पाहता सदर वादविषयाला घेवून भविष्यात वादी, प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ७ चे कायदेशीर प्रतिनिधीच्या दरम्यान अनेक दावे दाखल होऊ शकतात. तसेच प्रतिवादी क्र.१ यांची प्रस्तुत प्रतिदाव्याची मागणी पाहता प्रतिवादी क्र.७ चे कायदेशीर प्रतिनिधींना सदरचा प्रतिदावा चालविणेची संधी देणे उचित वाटते. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज कायद्यातील तरतुदीनुसार मुदतीत दाखल केलेला नसल्याने प्रतिवादी क्र.७ विरूध्द सदरचा प्रतिदावा हा अबेट झालेला आहे, परंतु प्रतिदाव्याचे स्वरूप पाहता, नैसिर्गिक न्याय निर्गितीकरीता प्रतिवादी क्र.७ यांचे विरूध्द झालेला प्रतिदावा अवसान आदेश रद्द करून त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी प्रतिदाव्याचे अभिलेखावर घेणेची परवानगी प्रतिवादी क्र.१ यांना देणे न्यायोचित ठरेल असे मला वाटते. याकारणास्तव मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

१. अर्ज (नि. १३३) मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र.७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे यांचे विरूध्द झालेल्या प्रतिदावा अवसान झालेचा (अबेट) चा आदेश रद्द करण्यात येतो.

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2025.03.04 17:44:28 +0530

**दिनांक– ०३/०३/२०२५**

**(मनिषा म. पाटील)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Stenographer | : | Smt. S.K.Kharat |
| Court Name | : | 2nd Jt. Civil Judge, J.D., Khed. |
| Date of Decision | : | 03/03/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 03/03/2025 |
| Order uploaded on | : | 04/03/2025 |